29
61

ANNEXURE – P/10

माहितीचा अधिकार/कालमर्यादा

जा.क्र. 419/माअ०५/२०११
सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे)
तथा शासकीय माहिती अधिकारी,
पोलीस आयुक्तांचे कार्यालय, मुंबई.
दिनांक :— ०७/०३/२०११

प्रति,

श्री. मेहमुद एम. अब्दी.
मेगा मॉल समोर, ओशिवरा,
अंधेरी (प), मुंबई— ४०० ०५३.

विषय :— माहितीचा अधिकार कायदा २००५
संदर्भ :— १) आपला दि. २४/०२/२०११ रोजीचा (अर्ज क्र.१ चा ) अर्ज.
२) जा.क्र. ३६१/वपोनि/खंडणी वि. कक्ष/२०११. दि. ०५/०३/२०११.
३) जा.क्र. १०५/वपोनि/गुगुप (लॉजि)/२०११. दि. ०२/०३/२०११.

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, आपण उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये अर्ज करुन माहितीची मागणी केलेली आहे. आपला अर्ज या कार्यालयात दि. २५/०२/२०११ रोजी प्राप्त झालेला आहे.

संदर्भ क्र.२ अन्वये वरिष्ठ पोलीस निरिक्षक, खंडणी विरोधी कक्ष, गु.प्र.शा., गु.अ.वि., मुंबई यांचे कार्यालयातुन संबंधीत अर्जाबाबत पत्र दि. ०५/०३/२०१० रोजी आले आहे. ते पत्र आपणास जोडुन दिले आहे. संदर्भ क्र.३ अन्वये वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गु.गु.प. (लॉजिस्टीक), गु.प्र.शा., गु.अ.वि., मुंबई यांचे कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या पत्रानुसार सदर अर्जाबाबत या कार्यालयास अहवाल "नि—रं—क" प्राप्त झालेला आहे.

नमुद माहिती उघड केल्याने, कोणत्याही व्यक्तीचे जीवन व शारीरिक सुरक्षितता धोक्यात येईल अथवा कायदयाची अंमलबजावणी करण्यासाठी किंवा सुरक्षिततेच्या प्रयोजनार्थ, गुप्तस्वरुपात दिलेल्या माहितीचा स्त्रोत किंवा मिळालेले सहाय्य ओळखता येईल अशी माहिती आपणास माहितीचा अधिकार कायदा २००५ मधील कलम ८(१)(छ) अन्वये नाकारण्यात येत आहे.

आपण इच्छुक असल्यास, या संदर्भात तीस(३०) दिवसांच्या आत प्रथम अपिलिय प्राधिकारी, मा.पोलीस उप आयुक्त,(प्रतिबंधक), शिवाजी मंडई, पोलीस आयुक्तांचे कार्यालय, मुंबई ४०० ००१. यांचेकडे अपील दाखल करु शकता.

(एम.जी.सपकाळ)
सहाय्यक पोलीस आयुक्त,
शासकीय माहिती अधिकारी (गुन्हे)
पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई.

O/C
WHCW6BB

सहपत्रे :—